# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना** :- धरमपेठ झोन क्र. 02 अंतर्गत गणशे विसर्जन, दुर्गा विसर्जन व
**{सा.बां.वि. झोन क्र. ०२}** धम्मचक्र प्रवर्तन दिन या कार्यक्रमा करीता बॅरीकेटींग करणे कृत्रिम तलाव ची उभारणी करणे, भाडे तत्वावर कृत्रिम टँक घेणे तसेच फिरते विसर्जन टँकची व्यवस्था करणे या कामाची मुळ प्राकलनीय रक्कम रू. 47,08,027/- असुन त्यामध्ये 18 टक्के जी.एस.टी. रू. 7,01,684/- विमा शुल्क रू. 77,965/- अधिक रॉयल्टी शुल्क रू. 30,134/- चा समावेश आहे. सदर्हु कामास पद क्र. A26501342206 अंतर्गत आर्थिक वर्ष सन 2025-26 मध्ये रू. 47,08,027/- चे प्रावधान उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. करीता सदर्हु प्राकलनास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिपः-**

1. सदर्हु कामाला मा. अधिक्षक अभियंता यांच्याव्दारे तांत्रिक मान्यता क्र. SE/PWD/T.S/79/2025-26 दि. 28/07/2025 नुसार तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.
2. सदर्हु कामाचा खर्च पद क्र. A26501342206 अंतर्गत प्रस्तावित आहे.
3. या कामाकरीता रितसर ऑनलाईन ई-निवीदा मागविण्यात येईल.
4. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 227/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 06/08/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धरमपेठ झोन क्र. ०२ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार धरमपेठ झोन क्र. 02 अंतर्गत गणशे विसर्जन, दुर्गा विसर्जन व धम्मचक्र प्रवर्तन दिन या कार्यक्रमा करीता बॅरीकेटींग करणे कृत्रिम तलाव ची उभारणी करणे, भाडे तत्वावर कृत्रिम टँक घेणे तसेच फिरते विसर्जन टँकची व्यवस्था करणे या कामाची मुळ प्राकलनीय रक्कम रू. 47,08,027/- असुन त्यामध्ये 18 टक्के जी.एस.टी. रू. 7,01,684/- विमा शुल्क रू. 77,965/- अधिक रॉयल्टी शुल्क रू. 30,134/- चा समावेश आहे. सदर्हु कामास पद क्र. A26501342206 अंतर्गत आर्थिक वर्ष सन 2025-26 मध्ये रू. 47,08,027/- चे प्रावधान उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुर प्रदान केली.